ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ . पुणें, बुधवार तारीख १ डिसेंबर, १९५३ अंक ४५

## विविध माहिती

**भाक्रा—नांगल धरणासाठीं पैसा**—भाक्रा—नांगल धरणाच्या बांधकामासाठीं भारतीय सरकार आणखी ३·९६ कोटी रुपये मंजूर करण्याच्या विचारांत आहे. चालू अर्थविषयक वर्षाच्या अंदाजपत्रकांत २२·२५ कोटी रुपये रक्कम धरणासाठीं मंजूर करण्यांत आलेली आहे. धरणाच्या कामाची गति वाढल्यामुळें आधिक पैशाची गरज भासत आहे असें समजतें.

**मध्यभारतांत नवा कारखाना**—मध्यभारतांत नागद्रा गांवाजवळ बिर्ला बंधूंनी रेयॉनचा एक कारखाना उभारला आहे. हा कारखाना ता. १६ डिसेंबर १९५३ पासून उत्पादन करण्यास प्रारंभ करील. श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी कारखान्याचें उद्घाटन करणार आहेत.

**रेल्वेच्या प्रदर्शन-गाडीचें उत्पन्न**—भारतीय रेल्वेजची प्रदर्शनाची गाडी ब्रॉड गेज रस्त्यावरील २७ स्टेशनांत मिळून ९३ दिवस ठेवण्यांत आली होती. मीटर गेज रस्त्यावरील गाडी ४१ स्टेशनांवर ९५ दिवस ठेवण्यांत आली होती. ११ जुलै ते १६ ऑक्टोबरपर्यंत ब्रॉड गेज स्टेशनांवर ३४,४३४ रुपये उत्पन्न झालें आणि ११ जुलै ते ३१ ऑक्टोबरपर्यंत मीटर गेज रेल्वेच्या स्टेशनावर २१,३४४ रुपये उत्पन्न झालें.

**बंगाली वाघांना मागणी**—प. जर्मन सरकारनें भारतीय व इतर आशियाई देशांतून जंगली जनावरें मागविण्यासाठीं बर्लिन मधील पशुसंग्रहालयाला ४०,००० मार्क्स दिले आहेत. पशुसंग्रहालयाच्या चालकांना दोन बंगाली वाघांची आतिशय जरूर असल्यानें प्रथम ह्या वाघांची खरेदी करण्यासाठीं रकमेचा विनियोग करण्यांत येणार असल्याचें समजतें.

**दुर्बिणीची प्रचंड शक्ति**—अमेरिकेंत माऊंट पालोमर ह्या ठिकाणीं २०० इंच व्यासाची कांच बसविलेली प्रचंड दुर्बीण आहे. ह्या दुर्बिणीची शक्ति इतकी मोठी आहे कीं ४१,००० मैलावर एकादी मेणबत्ती पेटवून ठेवली तर तीहि तीमधून दिसूं शकेल.

**अरविंदांच्या आश्रमाविषयीं चित्रपट**—पॉंडीचेरी येथील श्री. अरविंदांच्या आश्रमाविषयी ३ हजार फूट लांबीचा एक चित्रपट १६ मिलिमिटरच्या फिल्मवर घेण्यांत आला आहे. चित्रपट रंगीत आणि साधा अशा दोन्ही प्रकारचा असून पार्श्वसंगीतासाठी चायकॉव्हस्कीचें गीत वापरण्यांत आलें आहे.

**रशिआची मोटारींची निर्यात**—रशिआ लोकांना सहज वापरता येण्यासारख्या छोट्या मोटारी हॉलंड, बेल्जम, स्वीडन, फिनलंड इत्यादि देशांत निर्यात करूं लागला आहे असें समजतें. ह्या गाड्या जर्मनीच्या ओपल गाडीसारख्या असून स्वस्त आणि चांगलें काम देणाऱ्या आहेत, असें म्हणतात.

**भारतामधील टेलिग्राफच्या तारांची लांबी**—भारताच्या टेलिग्राफ खात्याच्या तारांची लांबी ४,००,००० मैल इतकी आहे. पृथ्वीच्या परिघाच्या २० पट भरेल इतक्या लांबीच्या ह्या तारा आहेत. ह्या खात्यांत २,२१,००० नोकर काम करीत असून त्यापैकीं १,००० गॅझेटेड ऑफिसर्स आहेत. सार्वजनिक उपयुक्ततेचें राष्ट्रीय मालकीचें हें नंबर दोनचें खातें आहे.

**स्टॅलिनग्रॅडचा नवा जन्म**—गेल्या महायुद्धांत उध्वस्त झालेलें स्टॅलिनग्रॅड शहर झपाट्यानें नव्यानें बांधण्यांत येत आहे. नवीन मोठ्या इमारतींत एक हॉटेल, एक ग्रंथालय आणि शहराचें भव्य रेल्वे स्टेशन ह्या इमारती आहेत. शहरांतील रहिवाशांना नैसर्गिक गॅसचा पुरवठाहि करण्यांत येणार आहे.

**पोलंडची तांत्रिक मदत**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तांत्रिक मदत फंडाला पोलंड ३,००,००० झ्लॉटीज म्हणजे सुमारें ७५,००० डॉलर्स इतकी रक्कम १९५४ सालीं देणार आहे. अविकसित देशांना तांत्रिक मदत देण्यासाठीं हा फंड उभारण्यांत आला असून फंडाला रशियाहि मदत करणार आहे.

**कुर्नूलसाठीं विजेचा पुरवठा**—आंध्र राज्याची राजधानी कुर्नूल ह्या शहराला म्हैसूर राज्यांतील जोग धरणावर उत्पन्न होणारी वीज पुरविण्याचा विचार चालू आहे. आंध्र सरकार ह्या योजनेसाठीं १० लाख रुपये खर्च करण्यास तयार आहे असें समजतें. शहरापासून ४१ मैल असलेल्या एका गांवीं जोग धरणाची वीज आलेलीच आहे. सध्या कुर्नूल शहराला होणारा विजेचा पुरवठा कोळशावर चालणाऱ्या केंद्राकडून होतो.

**चित्रपट-संगीतास बंदी**—पंजाबमधील लुधिआना जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींनीं आपल्या अखत्यारामधील खेड्यांतून चित्रपट-संगीताच्या रेकॉर्डस वाजविण्यास बंदी केली आहे असें समजतें. ह्या निर्णयामुळें एक पेचप्रसंगहि उद्भवला आहे. एका लग्नसमारंभांत वरानें फ़िल्म संगीत लावण्याचा हट्ट धरला. पण वधू पक्षाच्या लोकांनीं पंचायतीचा निर्णय न मानण्याचें नाकबूल केलें. ह्या संगीतानें मुलामुलींचें चारित्र्य बिघडतें, असा गांवकऱ्यांचा अभिप्राय आहे.

**विजेची ऊब देणारे मोजे**—फुटबॉल खेळणारे खेळाडू आणि बर्फावरील शर्यत खेळणारे लोक ह्यांच्या उपयोगासाठीं एका अमेरिकन कंपनीनें नवीन प्रकारचे मोजे तयार केले आहेत. हे मोजे विजेच्या साह्यानें उष्ण राखण्याची सोय करण्यांत आली आहे.

### औषधांच्या कारखान्यासाठी इटलीची मदत

इटलीमधील 'लेपेटिट' औषधी कारखान्याचे प्रतिनिधी डॉ. बी. अरूफो हे नुकतेच मुंबईला येऊन गेले. पेनिसिलिन व स्ट्रेप्टोमायसिनसारखीं आधुनिक औषधें तयार करण्याचा एक कारखाना काढण्यासंबंधीं भारतीय सरकारशीं आपल्या कारखान्याचीं बोलणीं चालूं आहेत, अशी माहिती त्यांनीं जाहीर केली आहे. ते म्हणाले कीं, संकल्पित कारखान्यांत इटली फारसें भांडवल घालूं शकेल असें वाटत नाहीं; तथापि एका भारतीय कंपनीशी सहकार्य करून तांत्रिक व इतर मदत मात्र इटली करूं शकेल. इटलीमधील औषधांच्या कारखान्यांची माहिती देतांना ते म्हणाले, कीं आमच्या देशांत औषधविषयक प्रयोग करणाऱ्या ९०० प्रयोगशाळा असून त्यांत ६०,००० लोक काम करतात. औषधांच्या धंद्यांत गुंतविलेलें एकूण भांडवल सुमारें १०,००० कोटी लायर असावें. हिंदी रुपयांत ही रक्कम अंदाजे ७६॥ कोटी रुपये भरेल. सर्व कारखान्यांत मिळून दरवर्षी ८,०००कोटी लायर किंमतीचीं औषधें तयार होतात. हिंदी रुपयांत त्याची किंमत सुमारें ६१ कोटी रुपये भरेल. औषधांचे नवीन कारखानेहि इटलींत काढण्यांत येत आहेत. नव्या कारखान्यांत १,००० कोटी लायर भांडवल गुंतेल असा अंदाज आहे. डॉ. अरुफो हे भारत आणि अतिपूर्वेकडील देशांचा दौरा काढण्यासाठीच इकडे आले आहेत. औषधांच्या भारतीय बाजारपेठेंत अजूनपर्यंत मुख्यतः ब्रिटिश, अमेरिकन व जर्मन कंपन्यांचींच औषधें असत. इटालिअन कंपनीशीं करार केल्यानें भारतांतील लोकांना आधुनिक औषधें स्वस्त मिळणार असतील, तर अर्थातच अशा कराराचें स्वागत केलें पाहिजे.

---

### भारतीय रेल्वेसाठी जपानी एंजिनें

भारताच्या रेल्वेसाठीं प्रथमच ७५ जपानी एंजिनें आयात करण्यांत येणार आहेत, असें समजतें. आशिआंतील एखाद्या राष्ट्रानें भारताला रेल्वे-एंजिनें पुरविल्याचें हें पहिलेंच उदाहरण असल्याचें सांगण्यांत येत आहे. भारतीय रेल्वे बोर्डानें आगगाड्यांच्या डब्यांसाठी टेंडर्स मागविलीं होतीं. टेंडर्स भरणाऱ्या देशांत जपान हेंहि एक राष्ट्र होतें. जपानमधील हिराची लिमिटेड ह्या कंपनीनें रेल्वे-एंजिनांचा पुरवठा करण्यासाठी टेंडर पाठविलें होतें. ह्या कंपनीकडे भारतानें ७५ रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. हीं सर्व रेल्वे एंजिनें भारतीय रेल्वेवर धांवणाऱ्या नेहमींच्या आकाराचीं असतील. ७५ जपानी रेल्वे एंजिनांना सुमारें २० लाख पौंड किंमत द्यावी लागेल असा अंदाज आहे. जपानशिवाय इतर परदेशांकडेहि भारतानें रेल्वे-एंजिनांसाठी मागण्या केल्या आहेत. जर्मनीमधील क्रप्स आणि हेन्स्लेन ह्या कारखान्यांकडून ७५ एंजिनें घेण्याचा भारताचा विचार आहे. ऑस्ट्रिआमधून ६० रेल्वे एंजिनें आयात केलीं जाणार असून कॅनडामधून १०० रेल्वे एंजिनें आयात होतील. जपानकडून भारताला लागणारी औद्योगिक यंत्रसामुग्री मिळण्यासारखी आहे, असें सांगतात. रेल्वे एंजिनांचा सौदा ह्या वृत्तास पुष्टी देणाराच आहे.

---

### युनायटेड वेस्टर्न बँकेची लोणंद कचेरी

युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा ह्या बँकेची लोणंद शाखा (जिल्हा उत्तर सातारा) विजयादशमीचे सुमुहूर्तावर, १७-१०-५३ रोजीं उघडण्यांत आली. त्यानिमित्त सकाळीं ९-३० ते ११-३० पर्यंत पानसुपारीचा समारंभ करण्यांत आला.


# कण आणि क्षण

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"

"कणाकणाचा आणि क्षणाक्षणाचा योग्य विनियोग करण्याचा" 'कर्मयोग' सर्वांनीं शिकावयास हवा. त्या कर्मयोगाचे सुबोध धडे श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं सोप्या भाषेंत आणि मार्मिक पद्धतीनें दिले आहेत. त्यांचें पुस्तक मला आवडलें.

—ना. सी. फडके

★

"या पुस्तकाचें वाचन करून, त्यांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहार-चतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीं."

—चिं. वि. जोशी

★

*"वाचकांच्या मनरंजनाबरोबर त्यांच्या विचारांत महत्त्वाची भर घालणारें पुस्तक."*

—शं. वा. किर्लोस्कर

पृ. सं. १६८ : : किं. २॥ रु.

१ "अर्थ", पुणें ४. ट. ख. ४ आ.

२ ग. वा. देवधर, एलिस ब्रिज, अहमदाबाद.

---

# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. २ डिसेंबर १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बचत व गुंतवणूक : बेकारीवरील उपाय

संसदेमधील बेकारीसंबंधांतील चर्चेच्या वेळीं अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं भारतामधील बेकारीच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला व बेकारी गेल्या कांहीं महिन्यांत विशेष वाढलेली नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. त्याचा अर्थ, परिस्थिति अधिक फार बिघडलेली नाहीं, एवढाच मर्यादित आहे. उद्योग विनिमय केंद्रांकडील नोंदणींचे आंकडे त्यांनीं निवेदन केले, त्याचप्रमाणें बेकारीबाबत चालू असलेल्या सरकारी चौकशांची प्रगतीहि त्यांनीं सांगितली, आणि ते म्हणाले, "चालू उत्पादनाचा उठाव होईल एवढेंच नव्हे तर त्या उत्पादनांत वाढ घडवून आणील, अशा रीतीनें मागणी वाढत आहे काय, हा मूलग्राही प्रश्न आहे. अशी मागणी वाढत राहिली तरच उत्पादन सुधारून लोकांची प्राप्ति व रोजगार ह्यांत वाढ घडून येईल. ह्याचाच अर्थ, उत्पादनकार्यासाठी भांडवलाची गुंतवणूक पुरेशा गतीनें होत आहे काय ? अशी गुंतवणूक झाली तरच उत्पादनवाढ व उद्योगवाढ शक्य होईल."

ह्यासंबंधांत श्री. देशमुख ह्यांनीं सरकारी योजनांवरील भांडवली खर्चाचे आंकडे दिले आणि खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांतील गुंतवणूक पुरेशा गतीनें होत राहिलेली नाहीं असें त्यांनीं सूचित केलें. प्रत्यक्ष कोणत्या क्षेत्रांत गुंतवणूक कमी पडत आहे, हा मुद्दा महत्त्वाचा नसून, भांडवलाचा संचय व विनियोग अधिक व्हावयास पाहिजे, ही गोष्ट जिव्हाळ्याची आहे. पंचवार्षिक योजनेप्रमाणें सरकारनें पत्करलेली जबाबदारी पार पडत असली तरी पुरेसे उद्योग निर्माण करण्यास तेवढ्यानें जरूर ती चालना मिळाली नाहीं, तर बेकारी वाढणें अपरिहार्य आहे. सरकारच्या धरणें वगैरे योजनांमुळें कांहीं ठिकाणीं बरींच नवीं कामें निर्माण झालेलीं आहेत, परंतु तीं देशांतील अगदीं कांहीं कोपऱ्यांतील केंद्रांत असून, उद्योगविषयक सर्वसाधारण परिस्थितीवर परिणाम घडवून आणण्याइतकीं तीं फारशीं नाहींत. १०० लोकांना काम मिळालें, तर त्यापैकीं सुमारें १५ सुशिक्षित असतील, असा अंदाज आहे.

खासगी उद्योगधंद्यांतील गुंतवणूक वाढावी, ह्यासाठी सरकार शक्य ते प्रयत्न करीत आहे, असेंहि श्री. देशमुख ह्यांनीं सांगितलें आहे. आहे ह्या परिस्थितींत काय केलें जात आहे, हें श्री. देशमुख ह्यांच्या भाषणावरून समजून येईल. परंतु, भारताची वाढती लोकसंख्या, कनिष्ठ प्रतीची रहाणी, हजारों कोटी रुपयांच्या भांडवलाच्या गुंतवणुकीची गरज, परदेशांकडून मदत मिळण्याच्या मर्यादा, ह्या मदतीबरोबर येणाऱ्या बंधनांची इष्टता व अनिष्टता, देशांतच भांडवल उभारणी होण्याचे मार्गांतील अडचणी, बचतीचें महत्त्व, इत्यादि दूरगामी गोष्टींचा खुलासा श्री. देशमुख ह्यांचे भाषणांत आढळत नाहीं. उद्योगाची वाढ व्हावयाची, तर उत्पादन कार्यक्षमतेनें व मोठ्या प्रमाणावर होण्यासाठीं त्यांत फारच मोठ्या भांडवलाची गुंतवणूक व्हावयास पाहिजे, हें श्री. देशमुख ह्यांनीं मान्य केलें; परंतु ही गुंतवणूक कोठून व कशी येणार हा प्रश्न शिल्लक रहातोच. गेल्या शंभर वर्षांपैकीं पाऊणशे वर्षें तरी भारत बाहेरून, विशेषतः ग्रेटब्रिटनकडून, भांडवल आयात करीत आला आहे. तो ओघ आतां आटला आहे. अमेरिकन पुंजीपती द. अमेरिका खंडांतील देशांतच पैसे गुंतविणें पसंत करीत आहेत, कारण भारतादि आशियाई देश गरजू असले तरी राजकीय दृष्ट्या ते जागरूक असून त्यांना भांडवलाबरोबर परकीय प्रभुत्व येईल अशी भीति वाटत आहे; अर्थात् ही भीति पूर्वींच्या अनुभवावर आधारलेली आहे. कराचें ओझें आणखी वाढविण्यास भारतांत वाव उरलेला नाहीं आणि सरकारी धोरण कामगार, शेतकरी, नोकर, इत्यादि वर्गांस बरी रहाणी प्राप्त करून देण्याचें आहे, तें हिंदी धनिकांच्या प्राप्तींत घट घडवून आणणारें आहे. पैसा हातीं येणाऱ्या ह्या वर्गाजवळ बचत करण्याइतकी आर्थिक कुवतच नाहीं. अशा एकंदर परिस्थितींत भारताचें आर्थिक व तदनुषंगिक राजकीय भवितव्य चिंतनीयन न झालें, तरच नवल. उपलब्ध आर्थिक बळाचा अधिकांत अधिक राष्ट्रीय उपयोग करविणारें कडक धोरण अंमलांत आणण्याचें सामर्थ्य असणारें सरकारच ह्यांतून मार्ग काढूं शकेल, हें उघड आहे.

### रशियन भाषेंत "अर्थशास्त्र"

कौटिलीय अर्थशास्त्राचें रशियन भाषांतर प्रसिद्ध झालें आहे. रामायण आणि महाभारत ह्यांचीं रशियन भाषांतरें ह्यापूर्वींच प्रसिद्ध झालेलीं आहेत. हिंदी व्याकरण, रशियन-हिंदी शब्दकोश आणि हिंदी-रशियन शब्दकोश, ह्यांचें काम चालू आहे. प्रत्येक शब्दकोशांत सुमारें ५०,००० शब्द असतील.

### राणीच्या वैमानिकाची चोरी

सोमवार, ता. २३ रोजीं रात्रीं वैमानिक कॅप्टन अँथनी लॉरेन हा ग्रेटब्रिटनच्या राणीचें विमान अटलांटिक महासागरावरून नेत असतांना इकडे त्याची सर्व आयुष्यांतील ९,००० पौंडांची बचत चोरीला गेली. दुसऱ्याच दिवशीं जेवणाच्या वेळीं मिसेस लॉरेनला एका अनामिक मित्राकडून ६,००० पौंडांचा चेक मिळाला. चहाच्या वेळेस मि. बटलिन ह्यांनीं ३,००० पौंडांचा चेक तिला दिला. "राणीचा जीव ज्याचे ताब्यांत आहे, अशा ह्या कॅप्टन लॉरेनला त्याची सर्व मालमत्ता गेल्यामुळें चिंता राहूं नये म्हणून मी हा चेक देत आहे." असें मि. बटलिन ह्यांनीं सांगितलें.

### सरकारी संस्थांतील नोकरवर्गाच्या शिक्षणासाठीं मध्यवर्ती समितीची स्थापना

निरनिराळ्या राज्यांतील सहकारी खातीं व संस्थांत नेमण्यांत आलेल्या अगर नेमण्यांत यावयाच्या नोकरवर्गाच्या शिक्षणाबाबत योजना आंखणें व त्यांच्या अंमलबजावणीची व्यवस्था करणें याकरितां रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशीं विचारविनिमय करून एक मध्यवर्ती समिति नेमण्याचें भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें ठरविलें आहे.

बाँबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता सदर समितीचे अध्यक्ष राहातील. समितीच्या दहा सभासदांत श्री. आर. जी. सरय्या (बाँबे स्टेट को. बँकेचे अध्यक्ष) व प्रो. द. गो. कर्वे (डायरेक्टर ऑफ प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन ऑर्गनायझेशन) हीं नांवें आढळतात.

### विमाव्यवसायावर अवलंबून असलेले लोक

भारतीय विमा-क्षेत्रांत काम करणारांची एकूण संख्या ३७,७२८ आहे. हे सर्व विमाक्षेत्रांत काम करून पोट भरूं शकणारे आहेत. त्यांपैकीं २५,६२५ नोकर असून १०,८६३ लोक स्वतंत्र काम करणारे आहेत; म्हणजे ते विमा एजंट आहेत. विमा-क्षेत्रांत काम करणारांपैकीं २९,९२६ लोक शहरांतील असून ७,८०२ ग्रामीण विभागांतील आहेत. ग्रामीण विभागांत विम्याचा प्रसार व्हावयास पाहिजे, परंतु तेथें विम्याचें काम मिळण्याची शक्यता कमी आणि त्यामुळें त्या कामावर पोट भरण्याची शक्यताहि फार थोडी. ग्रामीण विभागांत विम्याचें काम करणारांची संख्या इतर ठिकाणच्या मानानें दक्षिण भारतांत जास्त आहे; पश्चिम भारतांत विमाव्यवसायांतील लोकांची संख्या मोठी असूनहि तेथील ग्रामीण विभागांत फारच थोडे विमाव्यवसायी आहेत.

**अवलंबित लोक**

| भारत | मालक | नोकर | स्वतंत्र व्यवसायी | एकूण |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण विभाग | ४६३ | २,८६९ | ४,४५० | ७,८०२ |
| शहरें | ११३७ | २२,३९६ | ६,३९३ | २९,९२६ |
| | १,६०० | २५,२६५ | १०,८७३ | ३७,७२८ |

वरील आकडे जे लोक विमाव्यवसायावर पूर्णत्वानें अवलंबून आहेत, अशा लोकांबाबत आहेत. परंतु कितीतरी लोक जोड धंदा म्हणून विमा एजंटाचें काम करीत असतात, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल:—

**विमा एजंटाचें लायसेन्स**

| | नवीन | रिन्युअल | एकूण |
|---|---|---|---|
| १९४७ | ८५,२४५ | ८८,९२४ | १,७४,१६९ |
| १९४८ | ८२,३२० | ८७,६९६ | १,७०,०१६ |
| १९४९ | ८५,३८९ | ९५,३४८ | १,८०,७३७ |
| १९५० | ५५,९३७ | ६६,५२६ | १,२२,४६३ |
| १९५० | १५,६७७ | ३४,७९६ | ५०,४७३ |
| १९५१ | ६४,२०० | ६२,४९१ | १,२६,६९१ |


## महाराष्ट्र रिजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें

**नं. ५, बैरामजी जिजीभाई रोड, पुणें-१.**

या विद्यालयाचे पुढील वर्ग दिनांक १ जानेवारी १९५४ पासून नंबर पांच, बैरामजी जिजीभाई रोड, पुणें-१ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, ॲसिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, खरेदीविक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंती देण्यांत येते. सहकारी खातें व संस्था यांतील नोकरवर्गास तसेंच मॅट्रिक अगर तत्सम परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

विद्यालयांत प्रवेश घेवूं इच्छिणाऱ्यांनीं दिनांक १५ डिसेंबर १९५३ पर्यंत अर्ज करावेत व आपली जागा नक्की करून घ्यावी. अधिक माहितीसाठीं लिहा.

**सुपरिंटेंडेंट**
म. रि. को-ऑप. स्कूल, पुणें.


## हिराकुड योजनेचे आर्थिक फायदे

### गोखले इन्स्टिट्यूट पाहणी करणार

हिराकुड योजनेपासून होणाऱ्या आर्थिक फायद्यांची पाहणी करण्याचें काम पुणें येथील गोखले इन्स्टिट्यूटनें पत्करलें आहे. ओरिसा सरकारच्या विनंतीस अनुसरून हें काम स्वीकारण्यांत आलें आहे. ह्याचा तपशील ठरविण्यासाठीं ओरिसाचे अर्थमंत्री श्री. राधानाथ हे मुद्दाम पुणें येथें आले होते. हिराकुड धरणाचें काम सेंट्रल वॉटर ॲंड पॉवर कमिशन हें ओरिसा सरकारचे वतीनें करीत आहे. त्यास १०० कोटी रुपये खर्च येईल व तें १९५६ अखेर पुरें होईल. आर्थिक पाहणीचा खर्च कोणी सोसावा, ह्याबद्दल हें कमिशन व ओरिसा सरकार ह्यांच्यामध्यें वाटाघाटी चालू होत्या. अखेर, ओरिसा सरकारनें तो सोसावा, असें ठरलें. गोखले इन्स्टिट्यूट हिराकुड योजनेंतील पाणीपुरवठा, पूरनियंत्रण, जलवाहतुक आणि विद्युत्-निर्मिति ह्या सर्वांची पाहणी करील, परंतु होणाऱ्या खर्चावर व्याज काय सुटेल ह्याचा विचार ती करणार नाहीं असें समजतें. योजनेपासून होणाऱ्या आर्थिक फायद्यांवरच ती लक्ष केंद्रित करील. पाहणीचें काम दोन वर्षें तरी चालेल.

### विजेचें उत्पादन

गेल्या वीस वर्षांत विजेचें उत्पादन सर्वत्र वाढलें आहे. चीन, रशिया आणि कांहीं लहान देश वगळले, तर विजेचें जागतिक उत्पादन १९५१ सालीं ९५३०० कोटी kwt. झालें. १९३२ चे मानानें हें उत्पादन २७०% आणि १९३७ चें मानानें १३३% ज्यास्त आहे. रशियानें १९५१ मध्यें १०४०० कोटी kwt. वीज उत्पन्न केली.

सर्व जगांत वीज उत्पादनांत अमेरिका अग्रेसर आहे; त्या देशांत जागतिक उत्पादनाच्या ४६% उत्पादन होतें. कांहीं प्रमुख देशांतील उत्पादनाचे आंकडे येथें दिले आहेत:—

| | वीज उत्पादन (कोटी kwt.) |
|---|---|
| जग (रशिया, चीन वगळून) | ९५३०० |
| अमेरिका | ४३५६४ |
| ग्रेटब्रिटन | ६१५३ |
| कॅनडा | ५७४० |
| जपान | ४७७२ |
| फ्रान्स | ३६०२ |
| स्वीडन | १९५८ |
| भारत | ५८५ |

### कोबाल्ट बॉंबचा आसुरी प्रभाव

डॉ. आर्थर ब्लेक्सले ह्या गणितशास्त्राच्या प्राध्यापकांनीं कोबाल्ट बॉंबच्या विनाशक सामर्थ्याचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:— जोहान्सबर्गवर कोबाल्ट बॉंब टाकण्यांत आल्यावर वीस वर्षांनीं शहरांत प्रवेश केल्यास रस्त्यांतून मोठमोठीं झाडें इमारतीएवढीं उंच वाढलेलीं आढळून येतील. अगदीं नवीन जातीचे प्रचंड किडे सर्वत्र संचार करतांना दिसतील. जो निरीक्षक शहरांत पाहणीसाठीं प्रवेश करील त्याला शिशाचे पत्रे लावलेल्या गाडींत बसूनच आपलें काम करावें लागेल आणि श्वास घेण्यासाठीं खास तयार केलेला मुखवटा वापरावा लागेल; नाहीं तर त्याला फुप्फुसाचा कॅन्सर होईल. कोबाल्ट बॉंब टाकण्यांत आल्यावर कोठलेंहि शहर मनुष्याला राहण्यासाठीं १० ते २० वर्षें निकामी होईल.

## किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

वरील कंपनीला ३१ मार्च, १९५३ अखेरच्या वर्षी घसारा न काढतां ९,००,४४४ रु. तोटा आला. १९५१–५२ च्या अहवालांत ह्या परिस्थितीची पूर्वसूचना देण्यांत आलेलीच होती. सर्वच प्रकारच्या मालास मागणी उतरली आणि डीझेल इंजनांच्या बाबतींत भरमसाठ आयातीमुळें परिस्थिति अधिकच बिकट झाली. विक्री कमी झाली आणि तयार माल पडून राहूं लागला. भारत सरकारनें व मुंबई सरकारनें वेळींच सहानुभूतिपूर्ण धोरण ठेवल्यामुळें कारखाना चालू ठेवून कामगारांवरील बेकारीची आपत्ति कंपनी टाळूं शकली. आतां परिस्थिति सुधारत आहे. पंचवार्षिक योजनेखालील योजनांसाठी कंपनीच्या इंजनांना मागणी येत आहे आणि हैद्राबाद सरकारची पंपांना जोडणाऱ्या १,००० इंजनांची मागणी कंपनी पुरी पाडीत आहे. पाऊसपाणी समाधानकारक झाल्यामुळें इंजनांस मागणी वाढत्या प्रमाणावर असून विक्री अधिकाधिक होत आहे. आयातीवरील बंदी कायम राहिली, तर १९५३–५४ मध्यें कंपनीच्या हिशेबांत समाधानकारक प्रगति आढळून येईल.

| देणें | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| भांडवल | २४,०७,४९० | ब्लॉक | ३५,८३,२४६ |
| रिझर्व्हज् | ९,९५,९६६ | स्टॉक–इन–ट्रेड | ३१,१६,४०२ |
| देणीं व कर्जें | ४७,१७,३९८ | येणीं, ठेवी, | |
| | | आगाऊ खर्च | २,७९,०७१ |
| | | रोख | २,४१,६९१ |
| | | तोटा | ९,००,४४४ |
| एकूण रु. | ८१,२०,८५४ | एकूण रु. | ८१,२०,८५४ |

## दि आयुर्वेद रसशाळा पुणें, लिमिटेड.

वृतान्त वर्षांत आर्थिक मंदीच्या परिस्थितींत सुधारणा झालेली नसतांहि कंपनीनें सुमारें ६०,०००–०–० ची विक्रीवाढ केल्याचें ताळेबंदावरून दिसून येईल. अर्थात् ही वाढ करण्यासाठीं कंपनीस कांहीं बाबतींत अधिक खर्च करणें भाग पडलें, तथापि नफ्याचें एकंदर प्रमाण गेल्या वर्षींप्रमाणें आहे. वृतान्त सालांत रु. १७,७९१–५–० नफा झाला. सदर रकमेंतून मागील सालअखेरचा तोटा रु. १०,२७८–५–१० वजा जातां नफ्याची रकम रु. ७,५१२–१५–२ शिल्लक राहते. सदर रकमेंत रिझर्व्ह फंडांतील रु. ६,६२५–०–० ची भर घालून होणाऱ्या एकूण रु. १४,१३७–१५–२ ची विभागणी पुढीलप्रमाणें करावी अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| इन्कमटॅक्स रिझर्व्ह | रु. ३,५००–१४–२ |
| १९४९–५० व १९५०–५१ वर्षाचे प्रेफरन्स भागावरील डिव्हिडंड देणेकरितां | रु. १०,६३७—१–० |
| | एकूण रु. १४,१३७–१५–२ |

## हिंदुस्थान मोटर्स लि.

वरील कंपनीला ३१ मार्च, १९५३ अखेरच्या वर्षी ५·३७ लक्ष रु. नफा झाला. आतांपर्यंतच्या काळासाठी एकूण १२० लक्ष रुपयांचा घसारा काढावयाचा राहिलेला आहे. ग्रॉस ब्लॉक २८३·६८ लक्ष रु. चा असून घसारा फंडांत ६०·५२ लक्ष रु. आहेत. अहवालान्वे वर्षी २९३·७३ लक्ष रु. ची विक्री झाली. कांहीं थोड्याच मोटार-कारखानदारांना ह्या क्षेत्रांत ठेवावयाचें व परदेशी गाड्यांची आयात नियंत्रित करावयाचें सरकारचें धोरण मोटारींच्या कारखानदारांना पोषक होईल, असा विश्वास डायरेक्टरांनीं प्रकट केला आहे.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE


THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum*

## हिंदी पंपांचा खप कसा वाढेल ?

### इंडियन पंप मॅन्युफॅक्चरिंग ॲसोसिएशनचे अध्यक्ष, श्री. गुर्जर ह्यांचें भाषण

इंडियन पंप मॅन्युफॅक्चरर्स ॲसोसिएशनची पहिली वार्षिक साधारण सभा मुंबई येथें भरली होती. त्यावेळीं, ॲसोसिएशनचे अध्यक्ष श्री. एम. डब्ल्यु. गुर्जर ( किर्लोस्करवाडी ) ह्यांनीं पंपाच्या कारखानदारांपुढील सध्याच्या प्रश्नांचें दिग्दर्शन केलें. ६" पर्यंतच्या पंपाच्या आयातीवर सध्या नियंत्रणें आहेत, तीं १४" पर्यंतच्या पंपास लागू करावीत, असें त्यांनीं सुचविलें, आणि ६" पर्यंतच्या पंपाची आयात अजिबात बंद करावी अशी त्यांनीं मागणी केली. सध्या आयात कर १०½% आहे, तो ३०% करावा, असेंहि त्यांनीं सांगितलें. १" ते १४" पर्यंतच्या सेंट्रिफ्युगल पंपांची मागणी पुरी पाडता येईल, एवढी हिंदी कारखानदारांची उत्पादनक्षमता आहे. प्लॅनिंग कमिशननें घालून दिलेलें वार्षिक उत्पादनाचें उद्दिष्ट ८५,००० पंपांचें आहे. सध्या २० कारखान्यांत रोज ८ तास काम चालतें ह्या हिशोबानें, दरसाल ४,२८,००० पंप तयार होऊं शकतील; परंतु प्रत्यक्ष उत्पादन ५०,००० पंपाचेवर जात नाहीं आणि ते पंपहि खपविणें अवघड पडतें. श्री. गुर्जर ह्यांनीं हिंदी पंपांच्या निर्गतीचेंहि महत्त्व प्रतिपादन केलें.

त्यांच्या भाषणांतील इतर मुद्दे खालीलप्रमाणें होतेः—

( १ ) भारतानें दीर्घकालीन स्वरूपाचें निर्गतीचें धोरण आंखावें व परदेशीय बाजारपेठेंतील स्थान कायम राखण्याची पराकष्ठा करावी; त्यासाठीं, हिंदी नागरिकांवर थोडा बोजा पडला तरी तो कारणी लागेल.

( २ ) कारखानदार व व्यापारी ह्यांच्या प्रतिनिधींना परदेशांत ट्रेड कमिशनर म्हणून नेमण्याचें धोरण सरकारनें पत्करावें.

( ३ ) परदेशीय बाजारपेठांत हिंदी मालाचा खप वाढविण्याच्या खाजगी प्रयत्नांस सरकारनें उत्तेजन द्यावें.

( ४ ) व्यापारी शिष्टमंडळें परदेशांकडे पाठविण्यांत सरकारनें पुढाकार घ्यावा आणि आग्नेय आशिया, मध्यपूर्वेतील देश आणि द. अमेरिका येथें कायम स्वरूपाचे व्यापारी अधिकारी नेमावेत.

## दि इगल सिमेंट पाईप ॲण्ड कॉंक्रीट वर्क्सचा ३ रा वाढदिवस

वरील वाढदिवसाचा समारंभ द. सातारचे कलेक्टर श्री. आर. व्ही. देशमुख यांचे अध्यक्षतेखालीं शनिवार तारीख १७।१०।१९५३ इ. रोजीं विजयादशमीच्या मंगलदिनीं संध्याकाळीं ५ वा. कारखान्यांत साजरा करण्यांत आला.

## पंजाबमधील सहकारी बँका

पंजाब–सरकारनें आपल्या राज्यांतील सहकारी बँकांच्या भांडवलाची पुनर्घटना करण्याचें ठरविलें असून ह्या कार्यांतील पहिलें पाऊल म्हणून सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकांच्या भांडवलापैकीं १० लाख रुपयांचें भांडवल खरेदी करण्यास परवानगी दिली आहे. ह्या मध्यवर्ती बँकेसाठीं २५ लाख रुपयांचें भांडवल उभारण्याचें सरकारनें ठरविलें आहे. जिल्हा सहकारी बँकांसाठीं प्रत्येकीं ३ लाख रुपयांचें भांडवल जमा करण्यांत यावयाचें आहे. खाजगी भांडवलाला आपल्या रकमेची शाश्वति वाटावी म्हणूनच सरकारनें इतक्या मोठ्या रकमेचे भाग विकत घेण्याचें ठरविलें आहे. पुढील वर्षी सरकार ५ लाख रुपयांचे भाग विकत घेणार आहे. पहिल्या म्हणजे पुढील वर्षी १०,००० भाग विकत घेण्यांत येणार असून दुसऱ्या वर्षी ५,००० भाग विकत घेण्यांत येणार आहेत. रिझर्व्ह बँकेनें राज्यांतील सहकारी बँकांना कर्जे द्यावीं अशी विनंती पंजाब–सरकारतर्फे भारतीय सरकारला आज कित्येक महिने करण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँकेनें हीं कर्जे दिल्यास त्याजवरील व्याजाचा दर अगदीं अल्प म्हणजे १॥ टक्का इतकाच असतो. भारताची फाळणी झाली त्यावेळीं पंजाबमधील सहकारी बँकांना फार नुकसान सोसावें लागलें. कारण भारतीय पंजाबमधील बऱ्याच सहकारी बँकांची मालमत्ता पाकिस्तानांत राहून गेली आणि पाक–पंजाबमधील सहकारी बँकांची मालमत्ता भारतांत राहून गेली. फाळणीमुळें झालेल्या ह्या नुकसानीसंबंधीं सध्या बोलणीं चालू आहेत असें समजतें. पूर्व पंजाब ( भारतीय ) आणि प. पंजाब ( पाकिस्तान ) ह्यांमधील सहकारी बँकांच्या मालमत्तेचा परस्पर बदला करण्यांत यावा अशी तडजोड सुचविण्यांत येत आहे.

---

## युद्धजन्य अनाथांस साहाय्य करणारी संस्था

स्पेनमधील बंडाळीचे वेळीं तेथें जाऊन तेथील वृत्त एक ब्रिटिश वृत्तपत्राला पुरविणारे पत्रकार जॉन डगलस–डेव्हिस ह्यांना १९३७ मध्यें तेथील अनाथ, मुकेलीं, व भीतिग्रस्त मुलें पाहून एक कल्पना सुचली, त्यांनीं एका ब्रिटिश प्रवास-कंपनीच्या एजंटाला ती सांगितली आणि ते दोघे त्या कल्पनेचें प्रत्यक्षांत रूपांतर करण्याच्या मार्गाला लागले. अशा वैयक्तिक निराश्रित बळींना देशांतील लोकांनीं आर्थिकदृष्ट्या दत्तक घेण्याची " फॉस्टर पेरेंट्स प्लॅन फॉर वार चिल्ड्रेन, इनकॉ' योजना हें त्याचें फळ योय. ह्या संस्थेची मुख्य कचेरी न्यूयॉर्क शहरांत आहे, आणि तेथून बेल्जम, इंग्लंड, फ्रान्स, प. जर्मनी, ग्रीस, हॉलंड, इटली आणि कोरिआ येथील निराश्रित अर्भकांना मदत पोंचविली जात असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे केलें जात आहे. गेल्या १६ वर्षांत, युद्धामुळें शारीरिक व मानसिक दृष्ट्या पंगू झालेल्या ७२,००० मुलांना संस्थेनें साहाय्य केलें आहे. सध्या संस्थेतर्फे १०,००० मुलांची व्यवस्था केली जात आहे. एका मुलाचा दत्तक बाप व्हावयाचें, तर वर्षभर दरमहा १५ डॉलर द्यावे लागतात. दर आठवड्याला १४ डॉलर किंवा दरमहा ६० डॉलर दिले, तर क्षयाची भावना झालेल्या एका मुलाला तज्ज्ञ डॉक्टरांकरवीं उपचार केले जाण्याचें श्रेय दात्याला मिळतें. ह्या दत्तक बापांना त्यांच्या दत्तक मुलाच्या प्रगतीची माहिती व फोटो वरचेवर पाठविले जातात मनुष्या-मनुष्यांतील माणुसकीच्या अभावामुळें होणाऱ्या अन्यर्थांची नुकसानभरपाई करण्याची संधि ह्या संस्थेमुळें प्रत्येकास मिळूं शकते.

## रशिआमधील सिनेमा–व्यवसाय

सोव्हिएट रशिआमध्यें ब्रिटनच्या बोलपटांचा एक महोत्सव पुढील वर्षी भरविण्यांत येणार आहे. रशिअन निर्माते मि. अलेक्झांड्राव्ह हे सध्या ब्रिटनमध्यें दौऱ्यावर असून त्यांनींच वरील वृत्त जाहीर केलें आहे. रशिआमधील सिनेमा–व्यवसाया-संबंधीं बोलतांना ते म्हणाले:—" ब्रिटिश बोलपट समजण्याच्या कामीं फारशी अडचण भासणार नाहीं. कारण, रशिआंतील ३,५०,००,००० विद्यार्थी इंग्रजी जाणणारे आहेत अगर इंग्रजी भाषा शिकत आहेत. आमच्या देशांत मॉस्कोमधील बोलपटगृहांत त्रिमिति पद्धतीचे चित्रपट दाखविण्यांत येतात. पण असे चित्रपट पहाण्यासाठीं चष्मे वापरावे लागत नाहींत. हे चित्रपट पहाण्यासाठीं वापरण्यांत येणारा पडदा ८ टन वजनाचा आहे. अलीकडे त्रिमिति–पडदा प्लॅस्टिकचा करण्यांत येत आहे. लवकरच असे पडदे आम्हीं जगाला विकूं. हा पडदा सपाट नसतो. तो त्रिमिती मापाचा असतो. रशिआमध्यें कोठलाहि चित्रपट तयार झाला कीं त्याच्या ५,००० प्रती निरनिराळ्या ३२ भाषांमधून काढाव्या लागतात. रशिआंत करमणुकीवरील कर नाहीं; कारण सिनेमागृहें आणि चित्रपट सरकारच्याच मालकीचे असल्यानें सर्व उत्पन्न सरकारलाच मिळतें. आमच्याकडे सौंदर्य–स्पर्धा नसतात. अर्थातच अशा स्पर्धेत विजय मिळवून सिनेमा नटी होण्याचा मार्गच नसतो. नटी होण्यासाठीं स्त्रियांना योग्य त्या संस्थेत ५–६ वर्षे शिक्षण घ्यावें लागतें. गुन्हेगारासंबंधीं चित्रपट आमच्याकडे निर्माण करण्यांत येत नाहींत. त्यामुळें अशा बोलपटांमुळें उत्पन्न होणारा त्रासहि उद्भवत नाहीं. ब्रिटन आणि रशिआ ह्यांनीं परस्परांचें उत्कृष्ट बोलपट दाखविण्याची व्यवस्था केली तर उभय देशांमधील अंतर कमी होण्यास पुष्कळच मदत होईल.

---

## उत्तर प्रदेशांतील लोकरीचा धंदा

उत्तर प्रदेश राज्याच्या अर्थव्यवस्थेंत मेंढपाळांच्या व लोकरीच्या धंद्याला कांहींसें महत्त्वाचें स्थान आहे. ह्या व्यवसायाचा विकास घडवून आणल्यास तो अधिक महत्त्व पावूं शकेल अशी सरकारची कल्पना असल्यानें सरकारनें दोघा ऑस्ट्रेलिअन तज्ज्ञांच्या मदतीनें धंद्याची प्रगति साधण्याचा कार्यक्रम आंखला आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अन्न आणि शेतकी विभागाच्या मार्फत हे तज्ज्ञ भारतांत आले आहेत. मि. जी. आर. अपवुड आणि मि. एच्. डब्ल्यू. न्यूटन अशीं त्यांचीं नांवें आहेत. मि. वुड हे लोकरीचे तज्ज्ञ असून मि. न्यूटन हे मेंढ्यांच्या उत्तम जाती तयार करणारे तज्ज्ञ आहेत. आपआपल्या कार्यक्षेत्राबाबत ते उत्तर प्रदेश सरकारला सल्ला देणार आहेत. धंद्याचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीनें उत्तर प्रदेश सरकारनें एक योजना तयार केली आहे. मेंढ्यांच्या चांगल्या जातींची पैदास करण्यासाठीं आणि लोकरीचें संशोधन करण्यासाठीं अशीं दोन प्रकारचीं केंद्रें राज्यांत काढण्यांत येणार आहेत. तसेंच ह्या धंद्यांत जे लोक गुंतलेले आहेत त्यांना कसून शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. अधिकांत अधिक लोकर देणाऱ्या २८० ऑस्ट्रेलिअन मेंढ्या आयात करण्यासाठीं ऑस्ट्रेलिआंत चौकशी करण्यांत येत आहे. ह्या मेंढ्यांची आयात झाल्यावर त्यांना उत्तर–प्रदेशाच्या हवामानाची संवय होण्यासाठीं प्रयत्न करण्यांत येतील आणि नंतर राज्यांतील निरनिराळ्या केंद्रांत त्यांची पाठवणी करण्यांत येईल. त्याचप्रमाणें कांहीं मेंढ्यांचा उपयोग नव्या जातीचे कळप तयार करण्यासाठीं केला जाईल. मेंढ्यांची संकरण प्रजाहि निर्माण करण्यांत येईल. हें पैदाशीचें केंद्र हृषीकेश येथें राहणार आहे.

# वारसा कर कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदी

*(गुरुवार, १५ ऑक्टोबर १९५३) पासून १९५३ चा वारसा कर कायदा कार्यवाहीत आला. भारतांत एखादी व्यक्ति मरण पावल्यानंतर दुसऱ्याच्या मालकीच्या होणाऱ्या मालमत्तेच्या भांडवली मूल्यावर, सुटीची कांहीं मर्यादा वगळून, कर बसवून तो गोळा करण्याची तरतूद या कायद्यांत आहे. या कायद्यान्वये ठरविण्यांत यावयाच्या नियमांपैकी बरेचसे नियम त्याबाबत जनतेनें सूचना कराव्यात म्हणून भारताच्या जादा गॅझेटांत प्रसिद्ध करण्यांत आले.*

### कायद्याची व्याप्ति

जम्मू व काश्मीर वगळून सर्व भारतास हा कायदा लागू आहे. भारतांतील राज्यांत असणाऱ्या सर्व स्थावर व जंगम मालमत्ता करपात्र आहेत. हा कायदा लागू असणाऱ्या प्रदेशाबाहेरील स्थावर मालमत्तेवर हा कर लागू नाहीं. परंतु मृत्यूचे वेळीं भारतांत स्थायिक असलेल्या व्यक्तीच्या परदेशांतील जंगम मालमत्तेवर कर लागू होईल.

वारसा कर हा एकप्रकारचा परिवर्तन कर आहे म्हणजे कोणाकडे मालमत्ता जाते याचा विचार न करतां मृत्यूनंतर मालक बदलणाऱ्या मालमत्तेच्या मूल्याप्रमाणें तो आकारण्यांत येतो. १५ ऑक्टोबर १९५३ रोजीं वा त्यानंतर एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर दुसऱ्याच्या मालकीच्या होणाऱ्या अगर मालकी आहे असे समजल्या जाणाऱ्या अशा सर्व प्रकारच्या मालमत्तेवर कर द्यावा लागेल.

करपात्र मालमत्तेची व्याख्या पुढीलप्रमाणें दिलेली आहे:— (अ) स्थावर वा जंगम मालमत्तेवरील कोणताही हक्क, (आ) वरील (अ) मध्यें उल्लेख केलेल्या हक्काच्या विक्रींतून मिळणारें उत्पन्न, (इ) वरील (आ) मध्यें उल्लेख केलेल्या उत्पन्नाबद्दलची कोणतीहि रक्कम किंवा गुंतवणूक, (ई) कोणत्याहि मार्गांनीं एका स्वरूपांतून दुसऱ्या स्वरूपांत रूपांतर केलेली मालमत्ता, (उ) वाजवी हक्क (इक्विटेबल इंटरेस्टस), (ऊ) एखाद्या व्यक्तीनें करून ठेवलेलें कर्ज किंवा त्याच्या संमतीनें त्याचेकडून वसूल होणें असलेलें कर्ज (ए) प्रत्यक्ष अंमलांत न आलेली कायदेशीर मिळकत (ऐ) रोख किंमतींत रूपांतर करतां येण्याजोगी इतर कोणतीहि रक्कम, आणि (ओ) मयताच्या पैशानें एकादें कर्ज किंवा एकादा हक्क निवारण झाल्यामुळें होणारा लाभ.

या कायद्यांत 'मृत्यूनंतर मालकी बदलणें' याची व्याख्या केलेली नाहीं. मृत्यूमुळें मालमत्तेच्या मालकींत कांहींतरी प्रत्यक्ष बदल होणें याअर्थी तो शब्दप्रयोग वापरण्यांत आला आहे हें उघड आहे.

कांहीं प्रकारची मालमत्ता प्रत्यक्ष मृत्यूनंतर दुसऱ्याच्या मालकीची न होतां अशी मालकी बदलण्याबाबत आधींच तरतूद करून ठेवलेली असते. उदाहरणार्थ,

(अ) मयत व्यक्तीला विल्हेवाट लावण्याचा हक्क होता अशी मालमत्ता.

(आ) मयताच्या मृत्यूबरोबर मयताचा किंवा दुसऱ्या एकाद्याच्या व्यक्तीचा हक्क संपुष्टांत येणारी मालमत्ता.

(अशा प्रकारच्या मालमत्तेंत मिताक्षरा, मारुमक्कात्तयम किंवा अळियासंतान कायदा लागू असलेल्या संयुक्त कुटुंबाच्या मालकीच्या मालमत्तेंतील मयताचा एक घटक म्हणून असलेला वांटाहि येतो. परंतु त्या बाबतींत एक सूट देण्यांत आली असून संयुक्त हिंदु कुटुंबांतील मयत घटक जर वयानें १८ वर्षें पूर्ण झालेला नसेल तर कर घेतला जाणार नाहीं. मिताक्षरा कायदा लागू असणाऱ्यांचे बाबतींत मात्र मयत इसमाच्या मरणाचे वेळीं त्याचा पुरुष वंशज त्या कुटुंबांत एक घटक म्हणून अस्तित्वांत नसेल तर मयत व्यक्ति १८ वर्षांहून कमी वयाची असली तरी कर आकारला जाईल)

(इ) मृत्यूच्या अपेक्षेनें दिलेल्या देणग्या (डोनेशन मॉर्टिस कॉजा), अशा देणग्या परत घेणें शक्य असतें व मृत्यूपूर्वी या देणग्या अंमलांत येत नाहींत.

(ई) मृत्यूपूर्वी सहा महिने किंवा दोन वर्षांच्या आंत मयतानें हयात व्यक्तीस देणगी म्हणून दिलेली मालमत्ता, परंतु लग्नाकरितां दिलेली देणगी किंवा मयताच्या नेहमीच्या खर्चाचाच एक भाग म्हणून सिद्ध झालेली, परंतु एकूण ५००० रु. च्या आंत मोडणारी रक्कम या तरतुदीखालीं करपात्र ठरत नाहीं.

(उ) मयताच्या मृत्यूपर्यंतच हक्क असणारी एकादी मालमत्ता, किंमत घेऊन वा विना मोबदला, देऊन टाकली असेल वा सोडून दिली असेल तर अशा मालमत्तेवर कर लागू होईल.

मात्र, (१) सार्वजनिक धर्मादाय संस्थांचे बाबतींत अशी मालमत्ता मृत्यूपूर्वी निदान सहा महिन्यांचे आंत व इतर बाबतींत दोन वर्षांचे आंत दिलेली असली पाहिजे. किंवा,

(२) कांहीं हक्क राखून केव्हांहि दिली असली तरी कर लागू होईल.

(ऊ) स्वतःसाठीं तहहयात कांहीं हितसंबंध राखून मयतानें एकाद्या मालमत्तेबाबत ठराव करून तबदील केली असेल अशी मालमत्ता,

(ए) मयत व्यक्तीच्या स्वतःच्या व दुसऱ्या व्यक्तीच्या संयुक्त नांवानें, खरेदी केल्यामुळें किंवा मालकी बदलल्यामुळें संयुक्त मालकीची मालमत्ता मागें राहिलेल्या व्यक्तीला वारसामुळें हक्क मिळत असेल तर,

(ऐ) नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या किंवा बेचन करून दिलेल्या व्यक्तीच्या लाभासाठीं मयत व्यक्तीनें घेतलेल्या व त्यानें स्वतः किंवा त्यानें केलेल्या ठरावपत्रानुसार चालू ठेवलेल्या विमापत्राची मिळणारी रक्कम,

(ओ) मयतानें स्वतः अगर त्यानें दुसऱ्या व्यक्तीशीं व्यवस्था करून विकत घेतलेली वा व्यवस्था केलेली वर्षासनें वा इतर फायदे त्याच्या मृत्यूमुळें मिळणाऱ्या लाभाच्या प्रमाणांत करपात्र आहेत.

(औ) पांचाहून कमी व्यक्तींच्या नियंत्रणाखालील कंपनीकडे मृत्यूपूर्वी तीन वर्षांच्या आंत मयतानें कांहीं मालमत्ता बदली केली आणि त्याबद्दल कांहीं लाभ मिळवला किंवा मिळणार असला तर त्या मालमत्तेवर कर लागू होतो.

### करपात्र नसलेल्या मालमत्ता

पुढीलप्रकारच्या मालमत्तेची मालकी मृत्यूनंतर बदलत नाहीं व म्हणून तिच्यावर कर लागू नाहीं.

(अ) मयताच्या किंवा अन्य व्यक्तीचा एखाद्या पदाचा

अधिकारी म्हणूनच हक्क असलेली मालमत्ता किंवा धर्मादाय संस्थेकडून मिळणाऱ्या फायद्याची रक्कम.

(आ) विश्वस्त या नात्यानें मयताकडे असलेली मालमत्ता. मात्र स्वतःच केलेल्या ठरावपत्रान्वयें मयत व्यक्तीसह विश्वस्त असेल तर असें ठरावपत्र मृत्यूपूर्वी दोन वर्षांहून अधिक काळ आधीं केलेलें असलें पाहिजे. मयत व्यक्तीच फक्त विश्वस्त असेल तर ही कालमर्यादा पांच वर्षांची आहे.

(इ) वारसाच्या वहिवाटींत येण्यापूर्वी मयताचे हितसंबंध संपुष्टांत आलेली मालमत्ता.

(ई) पतीपत्नींपैकीं मागून हयात असणाऱ्या नवरा किंवा बायकोनें हा कायदा अंमलांत आल्यानंतर किंवा पूर्वी केलेल्या ठरावसूत्रानें मालमत्तेच्या येणाऱ्या उत्पन्नांपैकीं त्यास हयातीसाठी मिळणारा भाग.

(उ) ठरावाप्रमाणें मयताकडे त्याच्या मरणापर्यंतच असलेली व त्याच्या मृत्यूनंतर तें ठरावपत्र करणाऱ्याच्या मालकीची होणारी मालमत्ता.

(ऊ) मालमत्तेच्या संपूर्ण किंमती एवढ्या रकमेस विकत घेतल्यामुळें मालकी बदललेली मालमत्ता.

कोणताहि हक्क न ठेवतां दिलेल्या देणग्यांवर कर आकारला जाणार नाहीं. मात्र अशा देणग्या सार्वजनिक धर्मादाय संस्थांचे बाबतींत कायदेशीर सहा महिन्यांचेपूर्वी व इतर बाबतींत दोन वर्षांचे पूर्वी दिलेल्या असल्या पाहिजेत. या मुदतीचे आंत दिलेल्या देणग्यादेखील करपात्र न ठरण्यास पुढील गोष्टी पाळलेल्या असाव्या लागतील.

(१) देणगीचा ताबा तावडतोब दिला असला पाहिजे, (२) तिच्या मालकींत देणगीदाराचा संबंध असतां कामा नये. (३) करारानुसार वा अन्यप्रकारें देणगीदारानें आपल्याला कांहीं लाभ ठेवतां कामा नये. (४) कोणताहि हक्क राखून ठेवलेला असूं नये किंवा कांहींहि गुप्त व्यवस्था असतां कामा नये.

## एकत्रीकरण आणि मूल्यमापन

वारसा कर कोणत्या दरानें लागू करावा हें ठरविण्यासाठी मयताच्या मृत्युनंतर मालकी बदलणारी सर्व मालमत्ता 'एक मालमत्ता' होण्याच्या दृष्टीनें एकत्रित केली पाहिजे. (याला कांहीं मालमत्तेचा अपवाद आहे) कांहीं प्रकारची मालमत्ता करमुक्त असली तरीहि मालमत्तेचे मुद्दली मूल्य ठरविण्यासाठी ती एकत्रित करावी लागते.

वारसा कर ठरविण्यामध्यें बिनचूक मूल्यमापन हाच महत्त्वाचा प्रश्न गुंतलेला आहे. एखाद्या मालमत्तेच्या मुद्दली मूल्याची व्याख्या कायद्यांत पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आली आहे. मयताच्या मृत्यूच्या वेळीं ती मालमत्ता खुल्या बाजारांत विकली असती तर किती किंमत आली असती ती कंट्रोलरच्या मतानें वाटणारी रास्त किंमत बाजारभावानें येणारी किंमत म्हणजे जास्तींत जास्त येणारी किंमत. एकाच वेळीं सर्व मालमत्ता बाजारांत विक्री करावयाची आहे या सबबीवर मूल्यांत कपात करतां येणार नाहीं. मात्र मयताच्या मृत्यूमुळें ज्या मालमत्तेचें मूल्य घसरलें आहे असें सिद्ध करून देण्यांत येईल त्या बाबतींत योग्य तो विचार केला जाईल. जेव्हां मयताच्या मृत्यूनंतर लवकरच खुल्या बाजाराच्या स्थितींत एकादी मालमत्ता खरोखर विकून टाकण्यांत आली असेल तर विक्रीकरतां कराव्या लागलेल्या खर्चाचा विचार न करतां मिळालेली ठोक किंमत कर आकारणीसाठी विचारांत घेतली जाईल. हें मूल्यमापन संबंधित पक्षांनीं स्वतःच किंवा व्यावसायिकांच्या साहाय्यानें अंदाजें तरी चालेल.

संयुक्त कुटुंबाच्या मालमत्तेतील हक्कामुळें मिळणाऱ्या लाभाची किंमत कशी ठरवावी याबाबत आतां तरतूद (नियम ३९) करण्यांत आली आहे. या नियमाप्रमाणें असें ठरलें आहे कीं, मिताक्षरा, मारुमाक्कत्तयम किंवा अलियासंतान वारसा कायदा लागू असणाऱ्या संयुक्त कुटुंबाचे बाबतींत मरणाबरोबर संपुष्टांत येणारा वांटा मरणाच्या आधींच थोडा काळ वांटणी करण्यांत आली होती असें धरून ठरविण्यांत येईल. कर ठरविण्याच्या बाबींपुरतीच ही वांटणी झाली असल्याचें फक्त समजण्यांत येईल. त्या मयताला वांटणी मागण्याचा हक्क होता कीं नाहीं याचा विचार केला जाणार नाहीं.

हिंदु अविभक्त कुटुंबाच्या एकूण मालमत्तेची ठोक किंमत ठरवितांना देणग्या, ठरावपत्र इत्यादि गोष्टींबाबतच्या तरतुदी लागू होतील; म्हणजे कुटुंबाच्या कर्त्या पुरुषानें कायदेशीर कालावधींत केलेल्या अशा सर्व बदलाबदली त्या संयुक्त कुटुंबाच्या एकूण मालमत्तेंत धरण्यांत येईल व त्यानुसार मयताचा वांटा ठरविण्यांत येईल.

## मालमत्तेच्या किंमतींतून सूट

वारसा कर बसविण्यासाठी मालमत्तेची मुद्दली किंमत ठरवितांना कांहीं देणीं व इतर बोजे विचारांत घेतले पाहिजेत. कायद्यान्वयें पुढील वजावटीस मान्यता दिलेली आहे.— (अ) अंत्यसंस्काराचा १,००० रुपयांपर्यंतचा खर्च (आ) योग्य कर्जें व इतर बोजे. (इ) ५,००० रुपयांपर्यंतची हुंडा स्वरूपांत दिलेली मिळकत व (ई) एकूण मालमत्तेच्या ५ टक्क्यांपर्यंत परदेशांतील मालमत्तेची व्यवस्था व वसुलीचा खर्च. मृत्यु झालेल्या दिवसापर्यंतच्या कोणत्याहि स्वरूपाच्या लागू झालेल्या कराच्या रकमा देणीं म्हणून मानण्यांत आलीं असल्यानें त्या रकमाहि वजा करतां येतील.

सदरहू कायद्यांत नमूद केलेल्या करांचे दरश्रेणी पद्धतीनें निश्चित केलें आहेत. म्हणजेच प्रत्येक श्रेणीस लागू होणारे कराचे विविध दर चढत्या श्रेणीनें आहेत. मिताक्षरा मरुमक्कत्तयम अगर अलियासंतान कायद्याच्या कक्षेंत मोडणाऱ्या हिंदु कुटुंबांच्या मालमत्तेतील हितसंबंधांपैकीं ५०,००० रुपयांच्या मालमत्तेच्या पहिल्या श्रेणीवर कर लागू होत नाहीं. इतरांचे बाबतींत १ लक्ष रुपयांपर्यंत कर लागू होत नाहीं. कर बसविण्यांत न येणाऱ्या या पहिल्या श्रेणीस करमाफीच्या मर्यादा म्हणतात. (अपूर्ण)

---

## बँकांच्या लिक्विडेशनच्या कामाची त्वरा

ज्या बँकांची जिंदगी चांगली असते, अशा बँकांकडेच लिक्विडेटरांचें लक्ष असतें. ज्या बँकांकडून फारसा फायदा मिळणार नाहीं, अशा बँकांकडे दुर्लक्ष होतें व बिचाऱ्या ठेवीदारांचें मात्र नुकसान होतें. ठेवीदारांना रुपयांत एक आणा जरी मिळाला नाहीं, तरी लिक्विडेटरांना मात्र त्यांचें कमिशन मिळतें. ही परिस्थिति सुधारण्यासाठी सरकारनें बँकिंग कंपनीज (अमेंडमेंट) बिल, १९५३, हें पार्लमेंटांत मांडलें आहे. हें बिल मंजूर झाल्यावर हायकोर्टें ऑफिशिअल लिक्विडेटर्स व स्पेशल ऑफिसर्स नेमून लिक्विडेशनचें काम त्वरेनें पुरें करूं शकतील.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.